म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

लेखक गोपाळ गोविंद

सन १८८०

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव

चाै

ग्रं. टांग.

श्रीमंत

# आपासाहेब पेशवे

## यांचें चरित्र.

हें पुस्तक

गोपाळ गोविंद खरे,

यांनीं लिहिलें

तें

मुंबईंत

"बॉम्बे न्यू प्रेस" मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

सन १८९४.

किंमत ४ आणे.

खोऱ्याचा द्वेष्टा असून नेहमीं चाबूक चमकावणारं

विशेष नांवाजलेलें मासिक पुस्तक. { **खराप्रकार.** } अगदीं नियमित निघत असतें.

वर्गणी ट. हं. सह वर्षाचे १८२.

हें मासिक पुस्तक दिजंबर सन १८९० पासून निघूं लागलें. मुख्यतः नांवास अनुसरून लेख असतात. शिवाय इतर सर्व उपयुक्त, मनोरंजक निबंध, चुटके, खऱ्या असतील त्या गोष्टी, नाटकें, चरित्रें, कविता, प्रस्तुत कालांतरानुरूप सुधारक टोळीच्या सुधारणेचें वर्णन वगैरे अनेक विषयांचा समावेश सवडीनुसार यांत होत असतो. चांगुलपणाविषयीं अनेक सज्जनांचे अभिप्राय आहेत. पहिल्या वर्षाचे आठव्या अंकापासून प्रत्यंकांत एक प्रेक्षणीय चित्र दिलें जात असतें. कित्येक अल्पायुषी मासिक पुस्तकांप्रमाणें वर्गणी गट्ट करून बंद होणारा मात्र हा 'खराप्रकार' नव्हे. पहिल्या वर्षाची किंमत ट. सह १८१० पडेल. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अंकांस प्रत्येकीं १८२ पडतील. बांधलेल्या प्रत्येक वर्षाचे पुस्तकास वरीलपेक्षां प्रत्येकीं ८४ आणे जास्त पडतील.

**विक्षिप्त व खराप्रकार दोन्हीं घेणारांस ट. हां. सह वर्षाची वर्गणी ३ रु. मुंबईतील वर्गणीदारांस २॥ रु. फक्त.**

**पत्ता.**—खराप्रकार ऑफीस—कावसजी पटेल ट्यांकरोड मुंबई.

श्रीमंत

# आपासाहेब पेशवे

## यांचें चरित्र.

हें पुस्तक

गोपाळ गोविंद खरे,

यांनीं लिहिलें

तें

मुंबईंत

"बॉम्बे न्यू प्रेस" मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

( सर्व हक्क राखिले आहेत. )

सन १८९४

किंमत ४ आणे.

ग्रंथ संग्रह
नं. ..........
शा. ..........
क्रं.

॥ श्री ॥

हें लहानसें चरित्र,

ती० रावसाहेब सदाशीव हरी खरे,

सब्-जज्ज, कोर्ट रहिमतपूर,

यांचे सेवेशीं पित्रव्य

वात्सल्यार्थ अर्पण

केलें असे.

गो. गो. खरे.

## डाक्टर मोरेश्वर गोपाळ देशमूख,

### बी. ए. बी. एस. सी. एम्. डी. जे. पी.

यांजकडून या पुस्तकावर मिळालेला

### अभिप्राय.

" श्रीमंत आपासाहेब पेशवे, यांचें लहानसें चरित्र रा. गो. गो. खरे यांणीं लिहिलेलें मी समग्र वांचून पाहिलें. यांचा हा पहिलाच प्रयत्न असून त्या मानानें तो चांगला उतरला आहे. भाषा चटकदार आहे. वर्णनाची शैली चांगली आहे. व जरी कांहीं ठिकाणीं कांहीं भाग सदोष आहेत, तरी एकंदरीनें पुस्तक संग्रहणीय आहे, असें मला वाटतें. "

मो. गो. देशमूख.

# प्रस्तावना.

या आर्यावर्तावर केवळ स्वदेश हितासाठीं हातावर शीर घेऊन लढणारे जे रणशूर सरदार होऊन गेले, व ज्यांनीं आपला पराक्रम या भरतखंडावर गाजविला, ज्यांचे गुणानुवाद आपलें भरतखंडच नव्हे, तर सर्व जग गात आहे, त्या रणशूर थोर व दैवशाली पुरुषांपैकींच आमचे चरित्रनायक श्रीमंत चिमणाजीआपासाहेब पेशवे हे एक होत. यांचें स्वतंत्र चरित्र कोठें आढळून येत नसल्यामुळें तें असावें असें माझे मनांत आल्यावरून हें तयार केलें आहे.

बरेच दिवस माझे मनांत एखादें ऐतिहासिक पुस्तक लिहून तें लोकांपुढें मांडावें असें घोळत होतें; परंतु केवळ मज गरिबाजवळ हवेंतें (छापण्यासंबंधीं) साधन नसल्यामुळें, तें आजपर्यंत मनच्यामनांत राहून गेलें होतें; पुढें तें एका सन्मान्य, उदार व थोर पुरुषाचे साह्यामुळें मनाचा अंकूर वाढून हें चरित्ररूपी झाड बनलें आहे. तथापि या पासून फळ मिळणें हें मात्र लोकाश्रयावर अवलंबून आहे.

हें पुस्तक लोकप्रिय झालें तर दुसरीं लहान लहान ऐतिहासिक पुस्तकें काढण्याचा विचार आहे; तो सफल करण्यासाठीं परमेश्वरानें आश्रयदात्यांस उदार बुद्धी द्यावी, अशीं त्याजपाशीं प्रार्थना करतों.

हें पुस्तक लिहितांना माझे मित्र रा० रा० भाऊसाहेब आठले व पांडुरंग काशिनाथ खरे यांनीं ज्या उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे अत्यंत आभार मानतों. तसेच 'विक्षिप्त' पत्रकार रा. रा. भाव्ये यांनीं कृपा करून आपल्या पत्रांत थोडथोडें हें चरित्र छापून प्रसिद्ध केलें याजबद्दल त्यांचेही आभार मानल्या वांचून रहावत नाहीं.

पुस्तककर्ता.

# श्रीमंत

# आपासाहेब पेशवे

## यांचें चरित्र.

॥ तनू त्यागितां कीर्ति मागें उरावी ॥

रामदास.

ज्या महा पराक्रम–शाली शिवछत्रपती महाराजांनीं, मोठ्या कसबानें, केवळ रानटी, अडाणी व अज्ञान अशा मावळे लोकांचे सहायानें, त्यांचे एकनिष्ठ सेवेनें, त्यांचे इमानानें, व आपले स्वताचे भवानी तलवारीचे जोरानें, मराठी राज्याचा खंबीर पाया घातला, आणि त्याच खंबीर पायावर ज्यांनीं, ज्यांनी आपल्या पराक्रमानें व आंगचे जोरानें, धाडसानें, चातुर्यानें, व कर्तबगारीनें, मराठी राज्याचा मजबूत किल्ला बांधण्याचा प्रयत्न केला, व ज्यांचा ज्यांचा प्रयत्न अगदीं पूर्णत्वास आला, त्यांपैकींच आमचे या त्रोकट चरित्राचे नायक एक होत.

कोकणांत रत्नागिरी जिल्ह्याचे उत्तरेस, समुद्रकांठीं जें एक लहानसें खेडेगांव आहे, तें श्रीवर्धन खेडें पेशवे सरकारचें मूळस्थान होऊन आपणास "म-

हाराष्ट्र इतिहासामध्यें, धन्य ह्मणवून घेत आहे. हें खेडें शिद्दी यांचें होतें व आहे. अशा या लहान व परकीय लोकांचे ताब्यांतील खेडेगांवीं सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं एक कर्मिष्ट ब्राह्मण रहात असे. तो चितूपावन कोंकणस्थ केवळ ताकभात खाऊ; ह्मणून याचेच वंशांत मोठे पराक्रमी पुरुष होतील, हें कोणाचे स्वप्नींही नव्हतें. तो आपलें लहानसें घरचें शेत खपून त्या गांवचे कुळकर्ण्याचें काम करी. त्यास दोन पुत्र रत्नें होतीं. एकाचें नांव जनार्दनपंत व दुसऱ्याचें बाळाजीपंत, ह्मणजे ज्यांस पुढें बाळाजी विश्वनाथ असें ह्मणत असत. व हाच पेशवे सरकारचा मूळ पुरुष होय.

विश्वनाथपंताचा मुलगा बाळाजीपंत हा, आपले बापा प्रमाणें हुशार, मनमिळाऊ, प्रामाणीक, फर्डा कारकून, उद्योगी, धैर्यवान व दृढनिश्चयी होता. त्यास नेहमीं राज्यांच्या उलाढालींचा इतिहास व रामायण, भारत वगैरे ग्रंथ वाचण्याचा नाद असे. शिवाय त्यास हिंदूंचा, हिंदू राज्याचा व हिंदू धर्माचा मोठा अभिमान असे. परकीय किंवा परधर्मी लोकांकडून हिंदूंचा छल झाल्याची वार्ता त्याचे कानांवर आल्यास, त्याचे आंगावर रोमांच उभे रहात; व तो रागानें संतप्त होत असे. गांवांत त्याचें घर ह्मणजे

केवळ अन्नछत्र. कित्येक ब्राह्मण व अनाथ मनुष्यें जेवून त्याची कीर्ती गात गात जात असत.

त्यावेळेस मोंगली राज्याची अमदानी होती; ह्मणूनच मोंगल लोकांचे मणगटांत फाजील जोर होता. ते दुर्गुणाचें केवळ आगर. त्यांच्या दुर्गुणाचे परिणाम परकीय लोकांस ह्मणजे हिंदूंस भोगावे लागत असत. मोंगलांचे स्वार दिवसा ढवळ्या पाहिजेल त्याचें घर लुटून फस्त करीत, आंत जी काय चीजवस्त सांपडेल ती लूट ह्मणून घेऊन जात; वाटेल त्याच्या बायका पोरांस आपले बंदीवान ह्मणून धरून नेत, कित्येक स्त्रियांचे देखत त्यांचे प्रत्यक्ष पोटचे गोळ्यांचाही जीव घेत; व त्यांना निरर्थक अनेक तऱ्हेचीं दुःखें देत. सारांश, त्यांनीं आपले अधिकार सत्तेची, बेफामपणाची, निर्लज्जतेची, दुष्टपणाची व क्रूरपणाची शर्थ करून सोडिली होती. शेतकरी लोकांस त्यांचे पासून फार हाल सोसावे लागत; व कित्येक शेतकरी आपला नांगर सोडून चालतेही होत. त्यामुळें धान्य कमी पिकून महर्गता फार होऊं लागली. अशा समयास, ह्मणजे जेव्हां मुसलमानांचे पापाचे घडे भरले त्यावेळेस, ज्यानें आपले धैर्यानें बुद्धिबलानें व आपले कौशल्यानें सर्वास जर्जर करून सोडिलें, ज्यानें मी मी ह्मणणाऱ्या निजामउल्मुलुखा सारख्या

हिम्मत—बहादूर लढवय्याला, " दे माय धरणी ठाय " करावयास लाविलें, व ज्यानें आपले शुभ्र अजरामर कीर्तीचा झेंडा अटके पर्यंत फडकत नेऊन लाविला तो वीरमणी बाजीराव इ० स० १६९९ या वर्षी बाळाजीचे कुलांत जन्मास आला.

बाळाजीपंतास बाजीरावाचे जन्मानें जो आनंद झाला, त्यांत भर टाकावयास ह्मणून, किंवा बाजीरावाचे सहायास कोणी पाहिजे, किंवा त्याचा पाठीराखा कोणी पाहिजे, किंवा दोघांनींही सर्व भरतभूमी पादाक्रांत करून एकछत्री राज्य करावें, व त्या राज्यरूप इमारतीस एक स्तंभ पुरणार नाहीं, ह्मणून जणूं काय दुसरा स्तंभच, असा दुसरा एक पुत्र इ० स० १६९८ चे सुमारास ब्रह्मदेवानें बाळाजीपंताचे पोटीं निर्माण केला. व तोच चिमणाजी आपा, अथवा चिमणा राजा या आमचे चरित्राचा नायक होय.

पूर्वापार आंग्रे व शिद्दी यांचा वैमनस्याग्नी दिवसें दिवस अधिकच भडकत चालला होता आणि तो एका एकीं पेट घेऊन कोणत्या थरास जाऊन पोंचेल यांचें प्रमाणही नव्हतें. तेव्हां अशा ऐन समयीं कोणी हपशाला ह्मणजे बाळाजीपंताचे धन्याला सांगितलें कीं " बाळाजी तुमचा ताबेदार असतांना, आंग्र्याशीं ह्मणजे तुमचे हाड वैऱ्याशीं मसलती करितो, व त्याचे

मसलतीवरूनच आंग्रे आपल्यावर स्वारी करण्याचे बेतांत आहेत. " आधींच तो तापट व तिरसट हिंदुद्वेष्टा मुसलमानभाई, मग काय विचारावयाचें आहे? त्यानें तें वर्तमान ऐकल्यावर त्याची तळव्याची आग मस्तकास जाऊन पोंचली, व त्यानें तत्क्षणींच एका देशमुखाचे दोन देशमूख करण्याचा निश्चय केला.

ही बातमी बाळाजीपंतास समजली, तेव्हां त्याचे तोंडचें पाणी खाडकन उतरलें. इतक्यांत त्या 'दुष्ट शिद्दीनें बाळाजीपंताचे भावास गोणत्यांत घालून त्याचें तोंड बंद करून त्यास समुद्रांत बुडविलें. ही गोष्ट बाळाजीचे कांनीं पडतांच, त्याची काय अवस्था झाली असेल त्याची कल्पना करण्याचें काम वाचकांवरच सोंपवितों. शिद्दी याचे कान दुष्टांनीं फुंकलेले. आणि तशांत त्यानें कांहीं विचार न करितां केलेला पण, व बाळाजीचे भावास दिलेली जुलमी व कडक शिक्षा, हीं पाहून त्याचे मनानें धीर सोडला. त्याचे सर्व स्नायू गळून गेले. व त्यानें दोन मुलांसह व आपल्या कुटुंबासह एकदांचा घर सोडून देशांतरास जाण्याचा विचार मनांत आणिला. परंतु बाहेर आश्रय किंवा नोकरी कोठें मिळणार ? अशा फिकिरींत तो पडला . शेवटीं निरुपायामुळें त्यानें आपले जन्मभूमीस शेवटचा राम राम करण्याचा निश्चय केला; व तो लागलाच अमलांतही आणिला.

बाळाजीपंतानें आपलें घर सोडिलें आणि तें देखील जुनेंपुराणें रहातें घर सुटल्याबरोबर, त्याच्या तीव्र बुद्धीच्या दोघां मुलांचें गांवांतील रेम्या डोक्या तात्या पंतोजीच्या हाताखालील शिक्षण सुरू होतें तेंही अर्थांत सुटलें. बाळाजीपंतही त्यांस धैर्य येण्याकरितां रानटी पशूंच्या क्रूर स्वभावांची माहिती, वगैरे जें गृह शिक्षण देत असे तेंही सुटलें. त्यांचें तें संध्याकाळचें डोंगरांवरून धांवणें, व उन्हांतानांतून हिंडणें पार नाहींसें झालें. त्यांचें पौराणिक शिक्षण, त्यांच्या मुसलमानाचे पोरांबरोबरच्या बुक्या मारामाऱ्या, त्याचे इटिदांडू, हुतुतु, खोखो व आट्यापाट्या हे खेळ, मुसलमान पोरांना त्यांचे पासून त्रास, बाजीरावाचा एक मुष्टीमोदक तर आपांची श्रीमुखांत, वगैरे मुसलमान पोरांचे हाल, सर्व नाहींसे झाले. त्याचप्रमाणें त्यांच्या रोज कागाळ्या ऐकून बाळाजीपंतास आलेला त्रास नाहींसा झाला. मुलांचें वर्तन पाहून त्याला राग येई, ह्मणून त्यांना तो धमकावी, व कधीं कधीं शिक्षाही करी. परंतु घर सोडिल्यावर तो सर्व त्रासांतून मुक्त झाला.

बाळाजीपंत निघाला तो इ. स. १७०७ त साताऱ्यास आला. त्याचें दैव बलवत्तर, त्याचा पूर्व जन्मपुण्यसंचय फार, ह्मणून साताऱ्यास आल्यापासून

त्याचे भाग्योदयास प्रारंभ झाला. सेनापती जाधवराव यांचा आश्रय, शाहूमहाराजांचें कैदेंतून सुटणें, ते साताऱ्यास येऊन गादीवर बसणें, व त्यांचें धनाजीस वसुलाचें काम सांगणें, इत्यादि कित्येक गोष्टींमुळें, दिवसेंदिवस बाळाजीपंताचा उत्कर्षच होत चालला. धनाजीनें त्यास पहिल्यानें आपले हाताखालीं कारकून ह्मणून ठेविलें; व त्यांत त्याची तीव्र बुद्धी, इमानीपणा व हुशारी पाहून धनाजीची मर्जी त्याजवर सुप्रसन्न झाली. राजापुढें त्याची तारीफ वारंवार होऊं लागली, ह्मणून राजाची मर्जी त्याजवर बहाल होती. आणि शेवटीं त्याचा पगडा इतका बसला कीं धनाजीचे पाठिमागें सर्व दप्तरांचें काम तोच पाहूं लागला. व पुढें तो पेशवाई पदास चढला.

पहा, दैवयोग कांहीं चमत्कारिकच असतो. बाळाजीपंत पुढें पेशव्यांचे मुळपुरुष व्हावयाचे होते ह्मणूनच त्यांनीं आपल्या घरास रामराम ठोकिला; शिद्दीचें अरिष्ट आपल्यावर येणार अशी जी त्यांची भीति तीच त्यांचे पथ्यावर पडली. हे आपलें घर सोडावयास व दिल्लीस शाहूमहाराज कैदेंतून मोकळे होण्यास एकच संधी आली. बाळांजीचे भाग्योदयास इतकींच कारणें होतीं असें नाहीं, तर त्यांचे अलौकिक गूणही तसेच होते. त्यांचे गूण कसे होते याची प्रशंसा

करावी तितकी थोडीच. इतकें मात्र सांगितलें असतां पुरे होईल कीं, त्यानीं आपले गुणामुळेंच आपणांस भाग्योदयाचे कळसावर चढवून घेतलें. एक लहानसा कुळकर्णी, नंतर एक खरडे घांसणारा कारकून, व तोच पुढें तलवार पेलणारा पराक्रमी पेशवा व्हावा, ही ईश्वराचे घरचीच लीला नव्हे काय ?

बाळाजी सातान्यास आल्यापासून त्यांचे दोन्हीं मुलगे धनाजीचे हाताखालीं युद्धोपयोगी सर्व कला शिकले. दोघांसही घोड्यावर बसणें, तलवार खेळणें निशाण मारणें, बोंथाटी फिरविणें वगैरे सर्व कसब पूर्णपणें अवगत झालें. धनाजीला दोघांसही पाहून फार आनंद होत असे. तो त्यांची राजापाशीं तारीफ करी, व राजा देखील त्या दोघांस पाहून संतुष्ट होई. धनाजी त्यांचा गुरू, त्यांचा आश्रयदाता हा दोवां मुलांस मनापासून आवडे. असे ते आनंदानें वागत व नांदत असतां धनाजीवर एकाएकीं मृत्यूनें झडप घालून, बाजीराव, आपा व बाळाजीपंत या त्रिवर्गा-पासून त्यास ओढून नेलें.

बाळाजीपंतास शाहूनें मोंगलाईत कांहीं ऐवज येणें राहिला होता तो वसूल करण्यास चंद्रसेनासह रवाना केला. चंद्रसेन हा धनाजीचा पुत्र. त्याचे मनांत बरेच दिवस बाळाजी विषयीं कपटबुद्धी होती; व त्याचे

मनांत बाळाजीचा सूड घ्यावयाचा होता. त्यास ही संधी उत्तम मिळाली. त्यानें आपले स्वार बाळाजी, बाजी, व आपा यांचे मागें लाविले. चंद्रसेनाचे लोक फार व बाळाजीचे थोडे, तेव्हां बाळाजीस आपले दोन मुलांसह कांहीं दिवस पांडवांप्रमाणें अज्ञातवास काढावा लागला. व ते त्यावेळीं अरण्यांत छपून राहिले. त्यांच्या बरोबर तेव्हां पिलाजीरावजाधव, व नाथाजीधुमाळ ही जोडी होती. त्यांचें मात्र आपले धन्याविषयीं इमान जागृत होतें. त्या दोघांनीं व बाळाजीचे दोघां मुलांनीं त्यास हिम्मत देऊन, चंद्रसेना बरोबर प्रसंग पडल्यास दोन हात करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें पुष्कळ झटापटी झाल्या, व त्यांत आमचे चरित्र नायकाची शस्त्रकला दिसून आली. त्या झटपटींतून आमचे पेशवे विजयी होऊन तडक सातार्‍यास निघून आले. या झटापटी पासून आपांस इतकाच फायदा झाला कीं, आपलीं शस्त्रें शत्रूवर वापरण्याचें ज्ञान त्यांस प्राप्त झालें. व त्यांना आपलें शस्त्र रक्तांत बुडवून काढण्याची हीच पहिली संधी होय. त्यांत त्यांचें शौर्य व कसब पाहून बाळाजीपंतास अती हर्ष झाला. ज्याच्या बापास सर्व मोंगल लोक केवळ पाहून नव्हे तर त्याचें नुसतें नांव ऐकून थरथर कांपत, आणि ते देखील नुसते शिपाई किंवा लोकच नव्हे, तर घोडे

देखील ज्याचें नांव ऐकून पाणी पीत नसत, ज्याचें नांव ह्मणचे नुसता आगीचा गोळा, त्याचेच मुळापाशीं प्रथमच गांठ पडून दोन हात झाले, व ते हात विजय संपादून धन्य झाले, असें पाहून आमचे शूर आपांला आनंद झाला, यांत काय नवल !

बाळाजीची प्रकृती दिवसें दिवस क्षीण होत चालली. लढाईचे दगदगीनें व कारभाराचे त्रासानें त्यांच्या प्रकृतीस व्यथा जडली. व अशा स्थितींत सृष्टी क्रमानुसार त्यांचे आयुष्याचा शेवट झाला. आपांस फार दुःख झालें, पण ते विचारी असल्या मुळें त्यांनीं तें गट करून टाकिलें.

पुढें बाजीराव साहेबांस, पेशवाईस हेच योग्य आहेत असें शाहुमहाराजांस वाटून, पेशवा केलें. रावबाजी पेशवाईपद पावले तरी ते आपल्या धाकट्या भावास विसरले नाहींत, अथवा विसरून कसें चालतें! कारण, दोघेही एका बापाचे पुत्र, सख्खे भावांचें नातें. त्यांनीं राजकारभार आपांकडे सोंपविला. लहानपणाची दोघांची एकमेकां वरील प्रीती लडकाप्रमाणें दृढ राहिली. दोघेही सूर्याप्रमाणें चमकूं लागले. जसा बाजीरावाचा पराक्रम तसाच आपांचा. मात्र आपांस आपला पराक्रम दाखविण्याच्या तितक्या वेळा आल्या नाहींत ह्मणून. त्यांचेकडे थोडें लघुत्व; नाहींतर आपा

कांहीं कमी होते असें मुळींच नाहीं. दोघे एकाच ठिकाणीं खेळलेले, एकाच ठिकाणीं शिकलेले, दोघेही सारखेच धाडशी, मग एक कमी व एक जास्ती असें कां ह्मणावें ? बाजीरावास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं, त्यावेळेस आपांसही दुय्यम पेशव्याचे मान मरातब मिळून, सरंजामा दाखल सुपें परगण्याची जहागीर मिळाली होती. आणि त्याच वेळेस दोघांनीं हिंदूंचा छल करणाऱ्यांस, पादाक्रांत केल्याशिवाय विश्रांती घ्यावयाची नाहीं, असा निश्चय केला.

कोणतेही मनुष्यानें आपले छातीवर निश्चयाचें निशाण फडकावून दिलें ह्मणजे तो बोलेल तें करील असें समजावें. व त्याचे कृत्यांकडे, त्याचा देशच नव्हे तर सर्व जग डोळे लावून बसेल. बाजीरावास महाराजांची आज्ञा बुंदेलखंडचे राजे छत्रसाल यांस कुमक करावयास जाण्याची झाली. ती आज्ञा शिरसा मान्य करून ते तिकडे तडका फडक निघून गेले. ते गेल्या नंतर दिल्लीचे बादशहाकडून दक्षिणेंत निजाम-उलमुलुखावर फौज रवाना झाली. त्या फौजेचें अधिपत्य शहाजतखान भडभुंजे, अथवा सादतखान यांचेकडे होतें. या सैन्याचें वर्तमान निजामउलमुलुखास समजलें व आणखीं त्यानें असेंही ऐकिलें कीं, खान मोठे फौजेनिशीं, व कट्टे सरंजामानिशीं येत आहे.

असें पाहून त्यानें साताऱ्यास शाहू महाराजांकडे मदत मागण्यास वकील पाठविले.

वकिलांनीं येऊन कुमके विषयीं बोलणें लावतांच शाहू महाराज फिकिरींत पडले. कारण, बाजीराव साहेब व सरदार फौजसुद्धां बुंदेलखंडांत गेलेले. व ते तर त्यांचा उजवा हात. फौज नाहीं ह्मटलें तर मराठी राज्याचा मान जातो. अशा समयीं आमचे दुय्यम पेशव्यांस वाटलें कीं आपणास पुढें येण्यास हीच संधी फार उत्तम. असें मनांत आणून लागलीच महाराजांचे पुढें होऊन, "आज्ञा झाल्यास मी जाऊन कुमक करून येतों" असें मोठ्या नम्रतेनें सांगितलें. तरी महाराज फिकिरींतच. कारण कीं हे एकटेच कसे जातील! आपांस त्यांनीं विचारिलें कीं, " सर्व सरदार, फौजफांटा बाजीरावसाहेबांबरोबर बुंदेलखंडांत; तरी आपण एकटे कसे जाणार"? त्यावेळेस आपासाहेबांनीं मोठ्या समयसूचकतेनें व आवेशानें उत्तर दिलें कीं, जे सरदार व मानकरी बुंदेलखंडांत गेले आहेत त्यांचे लेंक व पुतण्ये मीं घेऊन जातों. हें उत्तर ऐकून महाराजांस मोठें कौतुक वाटलें. त्यांचे पोटांत आनंदाचा उमाळा येऊन त्यांस आनंदानें गुदगुदल्या होऊं लागल्या. त्यांस आपा केवळ दुसरे मूर्तीमंत बाजीरावसाहेबच वाटले. बाजीराव त्यांचा उजवा हात व आपा

त्यांचा डावा हात. ह्या प्रमाणें महाराजांनीं त्यांचे चातुर्य व धैर्यादी अमोलिक गूण पाहून आज्ञा केली कीं, " आपासाहेब तुह्मीं हैद्राबादेस जाऊन निजाम सरकारास मदत देऊन फते करून यावें. भवानीची तुमचेवर पूर्ण कृपा आहे. "

याप्रमाणें आज्ञा होतांच आपा साहेब निघाले. त्यावेळीं त्यांचे मुखावर, विरश्री रममाण झाली होती असें दिसलें. त्यांचें धैर्य पाहून सर्वांस वाटलें कीं, स्वारी फत्ते करून खचित् येणार. आपासाहेब कुमेकेस निघाले त्यावेळेस महाराजांच्या पुण्यप्रतापें करून, पंचवीस हजार फौज जमली. दरकुच दरमजल करीत चालले. आपांस लढण्याचा आवेश फार, परंतु त्यांनीं काव्यानें, मसलत सिद्धीस नेण्याचा विचार केला. शहाजतखान जेथें उतरले होते तेथें आपांनीं तळ दिला; स्वतः जाऊन खानास भेटले. खानानीं "आपण कोण" ह्मणून प्रश्न विचारतांच, मोठ्या खुबीनें "आह्मीं बाजीरावांचे कनिष्ट बंधू. पेशवे पडले जोरावर त्यांचें व आमचें पटत नाहीं, तरी कोठें चाकरी करण्यास बाहेर पडलों आहों, आपण ठेवाल तर राहूं" असा साफ जबाब दिला.

अगोदर मुसलमान जात गर्विष्ट, महत्वाकांक्षी, स्तुतिप्रिय व थोडी मूर्ख, अशा गुणांनीं भरलेली होतीच.

तशांत हा खान तर अधिकाराचे जोरावर व सैन्याचे अधिपत्यावर ह्मणून गर्वानें फुगलेला; खानाला आपांचा हा कावा काय माहीत ! तो आपल्याच ऐटींत व अधिकाराचे गुंगींत होता. त्यास हें मदतीचें प्रकरणही माहीत नव्हतें. तो आपल्या दिलांत येऊन फार खुष झाला. व उत्तर दिलें "बहोत अच्छा है." असें उत्तर दिल्यावर खानानें लागलीच चिमाजीचे फौजेची हजेरी घेतली, व त्यांस कांहीं खर्चास देण्याचें ठरवून आपांस चाकरीस ठेविलें. त्या खानास वाटलें कीं आतां आपली मोहीम फत्ते व्हावयाचीच. कारण, बाजीरावाचा रणशूर भाऊ आपल्यास मदत आला. असो. तो आपल्या मनांत वाटेल तितके मांडे खात होता. परंतु इकडे आपासाहेबांस आपला कावा खास सिद्धीस जाणार ह्मणून आनंद वाटला.

कांहीं दिवस तसेच लोटले. एके दिवशीं भर दोनप्रहरीं, सूर्य फार तापून उष्मा होत होता ह्मणून खानाचे सर्व लोक व खानसुद्धां आपले तंबूचे बाहेर, गार हवा घेण्यांत, आपला हुक्का पिण्यांत व आपली करमणूक करण्यांत अगदीं गर्क होते. त्यांचीं शस्त्रें जवळ नव्हतीं. असे ते बेसावध होते. इकडे आपांनीं आपल्या फौजेचा कडेकोट बंदोबस्त करून व पूर्ण तयारी करून खानाचे फौजेवर एकाएकीं छापा घातला. खाना-

ची तयारी नव्हती यामुळें तो फार घाबरला. त्यास काय करावें हें सुचेना. इतक्यांत आपांचे लोकांनीं कापाकापी सुरू केली. सर्वांची दाणादाण होऊन ज्याला जिकडे वाट सांपडली तिकडे तो पळत सुटला. खाना सुद्धां सगळ्यांची "दे माय धरणी ठाय" झाली. खान कसा तरी आपला जीव घेऊन पळाला. त्याची सर्व छावणी मराठ्यांनीं लुटली. त्याची कलावंतीण मस्तानी ( तिचा पुढें बाजिरावानें अंगिकार केला. ) आपांचे हातीं लागली. आपांनीं तिचे अंगास किंवा अब्रूस बिलकूल धक्का न लावितां तीस मोठ्या इभ्रतेनें व सन्मानानें आपल्या लष्करा समागमें घेतली. ती जीव देत होती, परंतु "तुझा प्रतिपाळ आमचे वडील बंधू बाजीरावसाहेब करितील" असें सांगून तीस बरोबर घेतलें. ( ह्या संबंधी बाजीराव साहेबांचे चारित्रांत निराळें वर्णन आहे. )

आतां आमचे चरित्र नायकास कोणी असा दोष लावण्याचें धाडस करितील कीं. तो खानाशीं कपटानें वागला, तर हा दोष लावणें ह्मणजे, मनुष्य व पशू यां मधील अंतर न समजण्यासारिखें आहे. कारण जेथें जेथें स्वराष्ट्र आहे, व जेथें त्यांतील लोकांची आपला उत्कर्ष व्हावा अशी उत्कंठ इच्छा आहे, तेथें तेथें त्यांच्या हातून अशा गोष्टी झाल्या शिवाय कधींही

राहणार नाहींत. आपांनीं ही गोष्ट आपले शत्रूचा बी मोड करण्याकरितां केली, यांत आह्मीं त्यांस बिलकूल दोष न लावतां उलटी त्यांची तारीफच करितों; कारण आपण आपले शत्रू बरोबर टक्कर देण्यास असमर्थ असलों ह्मणजे काय युक्ती लढवावी हें ते पूर्णपणें जाणत होते. आपा मदत करण्याकरितां गेले त्यावेळेस बाजीराव साहेब बुंदेल खंडांत असल्यामुळें आपां बरोबर फौजफांटा फार नव्हता; व मराठी राज्याचा उत्कर्ष व्हावा अशी त्यांची इच्छा होती. ह्मणून त्यांनीं लढण्याचा विचार एकीकडे ठेवून या युक्तीचा उपयोग केला. जर तिचा उपयोग त्यांनी केला नसता तर, मराठी राज्यावर कांहींतरी संकटें गुदरलीं असतीं. आपांस अशी गोष्ट करितांना फार वाईट वाटलें; व मराठी राज्याचा आब जाऊं नये व त्याचे कीर्तीस कलंक लागूं नये ह्मणूनच त्यांनीं ती गोष्ट निरुपायास्तव केली. शिवाय आपांचे घरीं सर्व गुण जणुकाय पाणीच भरीत होते. त्यानीं अबलांस कधींही कोणत्याही रूपानें व कसाही काडी इतका त्रास दिला नाहीं, हें ऐन ज्वानींमध्यें असलेल्या मस्तानीचे उदाहरणावरून चांगलें सिद्ध होतें. त्याच प्रमाणें गोष्ट वसईचे फिरंग्याचे पत्नीची. धारवाडी कांट्यानें पाहिलें तर आपांचे गूण तराजूच्या एका

पारड्यांत घालून दुसऱ्या पारड्यांत कोणत्याही इंग्लीश मुत्सद्याचे अथवा सरदाराचे गुण घातले तरी तें पारडें सदोदित खालतींच राहील यांत काडीमात्र संशय नाहीं.

असो. चिमणाराजा, शहाजतखानाची दैन्यावस्था करून, व त्यास पश्चात्तापांत पाडून जो निघाला, तो निजामउल्मुलुखाचे राज्यांत आला. त्यानें निजामउल्मुलुखास मदत केली ह्मणून त्याजपाशीं स्वारिचे खर्चाची मागणी केली. व निरोप पाठविला कीं, " स्वारी खर्च न द्याल तर तुमचें ठिकाण हस्तगत करून घेऊं. " या त्याचे निरोपावरून आपा किती शूर व धाडसी होते, याची कल्पना वाचकांनींच करावी. निजामउल्मुलुख ह्मणजे या तंबीला भिणारा गडी नव्हता. पण तो बाजीरावांस फार भीत असे. कारण, त्यांचे बडग्याचा सपाटा त्याला मिळालेला होता. व त्यानें असेंही मनांत आणिलें कीं, दक्षिणेंत एक आपण व दुसरे बाजीराव; बाजीराव तर फौजबंद व जोरावर, तेव्हां त्यांशीं वांकडें ठेविल्यानें नेहमीं कटकटी होतील. व त्या टाळाव्या ह्मणून त्यानें सर्वांची मसलत घेऊन, आपास स्वारी खर्च रोख देऊन, दवलताबादचा किल्ला व बीडपायथरी वगैरे साठ लक्षांचा मुलूख दिला. अशा थाटानें पहिल्याच खेपेस विजयध्वज उभारून आपांची स्वारी सातान्यास यावयास परतली.

आपा साताऱ्यास येउन पोंचले, तोंच बाजीरावसाहेबही बुंदेलखंडांतून माघारे साताऱ्यास आले. दोघां भावांची भरतभेट झाली. परस्परांनीं परस्परांचे मोहिमेची हकीकत निवेदन केली. आपांनीं मस्तानीचा इतिहास बाजीरावांस सांगून ती त्यांचे हवालीं केली. त्या वेळेस बाजीरावांची, आपांची वडिलांस मान देण्याची रीती व आपल्या ठायीं दृढ प्रीती पाहून, काय बरें स्थिती झाली असेल! वास्तविक पाहतां आपा बाजीपेक्षां ज्वान व मस्तानीही तरूण. दुसऱ्या कोणत्याही मनुष्यानें तिचा, सर्व गोष्टी एकीकडे गुंडाळून ठेऊन, स्वतःच अंगिकार केला असता; परंतु आपा पडले मनोनिग्रही व पापभीरू. त्यांचे हातून तें कृत्य होईना; ह्मणून त्यांनीं मस्तानीला बाजीरावांचे स्वाधीन केली, व बाजीरावांनींही तिचा अंगिकार मोठ्या आनंदानें केला. नंतर राजाज्ञा घेऊन दोघेही पुण्यास निघाले. निघते वेळेस महाराज बोलले कीं, "मध्यवस्ती पाहून आपल्यास राहण्यास वाडा बांधा." त्या प्रमाणें वाडा बांधावयास सुरवात केली. वाडा मोठा भव्य व मजबूत बांधिला.

इकडे दिल्लीचे तक्तावरील नामधारी बादशाहा महमदखान होते. ने जातीचे म्लेंच्छ व एवढ्या मोठ्या अधिकाराचे गादीवर, तेव्हां त्यांचा सर्व काळ ऐष

आरामांत जावयाचा. राजा सदां सर्व काळ ऐषआरामांत गुंग असला, किंवा प्रजा नाखूष असली ह्मणजे राज्यास उतरती कळा लागलीच असें समजावें. तद्वतच दिल्लीचे तक्ताची स्थिती होती. पादशहा स्वतः कैफाचे गुंगींत. सर्व कारभार पाजी व व्यसनी लोकांचे हातांत. त्यांचा सर्व काळ, सूज्ञ व नितीमान गृहस्थांची चेष्टा करण्यांत, किंवा दुर्व्यसनांत किंवा खुषमस्कऱ्यांत खर्च होत असे. नाच, रंग, तमाशे हें सर्वांचें कर्तव्यकर्म बनून राहिलें होतें. एका—वारयोपितेनें तर पादशहास पक्कें घेरून टाकिलें होतें. तिचा शब्द तो हुकूम. व ती ह्मणेल ती पूर्व दिशा. अशी राज्याची सद्दी असतां दिल्लीचे तक्ताधिपती महमदशहा बादशहा यांजकडून गुजराथ प्रांतावर सरबुलंदखान नांवाचा सरदार नेमला गेला.

त्यावेळेस सुभेदार ह्मणजे ही एक बंडच असे. वास्तविक पाहतां ते पादशहाचे अंकीत व त्याचे हुकुमाचे बंदे नोकर. त्यांचें कर्तव्यकर्म ह्मटलें ह्मणजे नेमलेला खंडणीचा ऐवज, योग्य न्याय करून बादशहाकडे पाठवावयाचा. परंतु बादशहाची वर सांगितल्या प्रमाणें स्थिती असल्या कारणानें ते आपणांस स्वतः सिद्ध छोटे राजेच ह्मणवीत असत. त्यांचा सर्व उद्योग ह्मटला ह्मणजे, लोकांकडून जुलमानें पैसा काढावयाचा,

वाटेल त्यास लुटावयाचें, त्यास कैद करावयाचें व त्याचे हाल करावयाचे; व वाटेल त्यास वाटेल ती शिक्षा द्यावयाची. अशी स्थिती असल्यामुळें खानावर हल्ले होत; आणि अर्थात ते आमचे विजयी मराठ्यां कडून वारंवार होऊं लागले. त्यामुळें खान अगदीं त्रासून गेला.

त्यानें बादशहाकडे बहुत वेळ अर्ज करून कुमक मिळण्याविषयीं विनंती केली. परंतु सर्व बेबंदशाही. स्वतःला मराठ्यांचा पराभव करून त्यांची खोड मोडण्याचें सामर्थ्य नव्हतें. बादशहाकडून कांहींच उत्तर नाहीं. असें पाहून खान अगदीं त्रासला. शेवटीं निरुपाय होऊन त्यानें त्या प्रांतातील, मराठे सरदार, गायकवाड, बांडे, दाभाडे इत्यादिकांना कांहीं हक्क कबूल करून मदतीस येण्याविषयीं विनंती केली. परंतु तिकडूनही नन्नाचा पाडा; कारण, त्यांना बाजीचें भय. अशी स्थिती असतां चिमाजी आप्पा, एकाएकीं बाजीरावाचे अज्ञेवरून गुजराथेंत उतरला. बरोबर फौजेची जय्यत तयारी; त्यानें पहिल्या तडाक्यासच पेटलादची खंडणी घेऊन धोळका परगणा लुटला. मग काय विचारावें. खानाची पांचावर धारण बसली. त्याचें सर्व शौर्य, धैर्य, गळून गेलें. आप्पाही आंगजोरानें खंडणी घेत चालले. खानानें तहाचें बोलणें लाविलें.

आपा तहाचें बोलणें ऐकतना. त्यांनीं आपला पूर्ववत सपाटा चालविला, त्यामुळें खान फार घाबरला. त्याचे ज्ञानानें व त्याचे मनानें त्यास सोडिलें. इतक्यांत कर्म धर्म संयोगानें खानाची घडी पुरी भरली नव्हती ह्मणून बाजीरावाचें आपांस पत्र आलें कीं, “ खान तहाचें बोलणें लावीत असल्यास तें मान्य करून आपण कोंकणांत निघून जावें.” आपाचे मनांत तह करावयाचा नव्हता. परंतु वडील बंधूचे उलट कधींही न गेल्यामुळें ती आज्ञा शिरसावंद्य करून तह केला. त्यांत पेशव्यांस सुरतेखेरीज खानाचे सर्व मुलखाची सरदेशमुखी व चौथाई व अमदाबाद शहराची रोख खंडणी मिळावी, व पेशव्यांनीं त्याचे संरक्षणार्थ त्याचे खर्चानिशीं २५०० स्वार नेहमीं ठेवावे असें ठरलें. असा तह १७२९ त करून आपा माघारे परतले.

माळवाप्रांत जिंकावयाचा बाजीरावाचा पूर्ण मानस. परंतु त्या प्रांतावर मोंगलांचा सुभेदार ताबेदारी करीत असे. त्याचें व मराठ्यांचें गरुड सर्पाप्रमाणें सख्य. दोघही एकमेकांचे नाशावर टपलेले. त्याची मराठ्यांपाशीं नेहमीं कटकट, नेहमीं लढाईशीं व हरहमेश कापाकापीशीं गांठ. व त्यांतच राजा गिरीधर—तेथील सुभेदार, यास आपलें सर्व कांहीं ऐहिक सोडून स्वर्गवासी व्हावयास लागलें. त्याचा आप्त कोणी दायबहादुर ह्मणून

होता. त्याचेही मनांत मराठ्यांविषयीं द्वेष बुद्धी होती. त्यास लढाईची खुम खुम फार असे. कारण, त्याची उमेद पडली ताजी व रग जिरलेली नव्हती. त्याचा मराठ्यांस व त्याचे प्रजेस नेहमीं त्रास असे. मराठ्यांस त्यानें बहुत वेळ पिटाळून लाविलें. व मराठे पळतात असें पाहून त्यासही फार धन्यता वाटे. तो मराठ्यांस कसपटा समान मानी. कारण, त्यानें त्यांचा हात अनुभविलेला नव्हता. हें पाहून मराठे पक्षाचे जे वाली बाजीराव व अप्पासाहिब यांचे तळव्याची आग मस्तकास जाऊन पोंचली. त्यांचे मनांत मुसलमानांची पाळें मुळें खणून टाकून हिंदु राज्य स्थापावयाचें. त्यांत बाजीरावाचे जिवाचा कलिदा व वंदा नोकर आपा त्यांस सहाय. मग किती उशीर ! बाजीरावांनीं आपांस आज्ञा दिली कीं "माळव्यांत जाऊन मोंगलांस हात दाखवून त्यांची खोड मोडून येणें." अशी आज्ञा होतांच आपांचा मोर्चा तिकडे फिरला.

आपा एखाद्या पिसाळलेल्या वाघाप्रमाणें मोठ्या तडाक्यानें निघाले. मनांत हेतु कीं, दायबहादुरास चांगला हात दाखवावयाचा. मग सैन्याची तयारी काय सांगावी. सैन्यासहित आपा चालले ते दर कुच दर मजल करीत मोठमोठ्या मजला मारून माळव्यांत दाखल झाले सर्व लोकांस थरकांप सुटला. शत्रू

सामन्यास उभे ठाकले. त्यांस आमचे पराक्रम शाली मराठ्यांचें लढण्याचें कसब व अप्रतीम शौर्य काय माहीत. पिलाजीराव जाधव व मल्हारराव होळकर आपां बरोबर. ह्मणजे एक वाघोबा व दुसरा सिंहोबा. दोघेही लढाईचे कामांत कसलेले. त्यांना आपल्यास जागा कशी असावी, हल्ला कोठून कसा करावा वगैरे गोष्टी अगदीं तोंडपाठच. व या आमचे शूर सरदारांचे तरवारीचें पाणी त्या गनिमास माहीत नव्हते. खान आपल्याच गुंगींत. दोन्हीं पक्षांच्या तरवारी समरांगणीं चमकूं लागल्या. कापाकापी सुरू झाली. रक्ताचे पाट वाहूं लागले. घोड्यांच्या टापां शिवाय, तरवारींचे खणखणाटां शिवाय, व तोफांचें गर्जना शिवाय कांहीं एक ऐकूं येईनासें झालें. कोणास कोणी ओळखीना. मराठ्यांचा "हरहर महादेव" असा आवाज मात्र ऐकून ओळख पटे. ही भयंकर लढाई ताला येथें झाली. त्यांत होळकरानें अवर्णनीय पराक्रम केला. आधिंच तो गडी चेतावलेला, तशांत खऱ्या वीर तेजाचा, व त्यांत भर टाकण्यास शत्रूचा सूड उगविण्याचें मनांत असून स्वतः पुढें झालेला व आपल्या कर्तबगारीनें पुढें आलेला. मग त्याचे लढाईतील पराक्रमाची व शौर्याची तारीफ सर्व महाराष्ट्रभर व्हावी यांत आश्चर्य तें काय. दोन्हीं पक्षांचे लढाईची परा-

काष्टा झाली. दायबहादूर आपल्या अनुयायांसह स्वतः बहादूर असतांनाही मागें हटला. मागें हटल्या बरोबर त्याच जागेवर यमाजीपंतांनीं त्यास आपला कैदी केलें. आपले सेनानायकाची दुर्दशा पाहून शत्रूची फौज धुम ठोकून दशदिशा पळत सुटली. सर्वांचीं हत्यारें, पोषाख, घोडे, जागचे जाग्यावर राहिले. कारण, जिवापुढें तें सर्व तुच्छ होतें. अशी शत्रूचे सैन्याची दीनावस्था झाली, तेव्हां सहजच आपांस जय मिळाला. त्याची सर्व हकीकत त्यांनीं आपले परम पूज्य वडील बंधू बाजीराव व परममान्य महागुरू धावडशीकर यांस पत्रद्वारें निवेदन केली. त्यांत मल्हाररावांचे पराक्रमाची प्रशंसा केली होती. ह्मणून त्या मोहिमेंत पेशव्यांस मिळालेल्या मुलखाचा बहुतेक भाग ह्मणजे इंदूर वगैरे, होळकरांस सरंजामा दाखल बक्षीस केला. व तो अद्यापी त्यांचे वंशाकडे चालत आहे. असा जयघोष करीत मराठे माळव्यांतून परतले.

चिमाजी आपांना केवळ लढाईचाच नाद होता, किंवा त्यांतच त्यांचा हात खंडा होता असें नाहीं. त्यांचा हात कारभारांतही खंडाच होता. बाजीरावांचे वेळचा सर्व राज्यकारभार तेच पहात असत. बाजीराव नेहमीं स्वाऱ्यावर व मोहिमेवर असत, त्यामुळें आपांस नेहमीं कारभाराचें खटलें संभाळावें लागत असे. त्यांचे

आंगचें कारभारांतीलही चातुर्यही फार विलक्षण होतें. त्यांचा कारभार दक्ष व मोठा खुबीचा असे. त्यांची सर्वांवर समदृष्टी पाहून महाराजही खुष होते. ह्मणून त्यांस महाराजांनीं पुष्कळदां शाबासकीही दिलेली होती. ज्याप्रमाणें त्यांना लढाई मारण्याचा नाद असून त्यांचे आंगांत ती जिंकण्याचा पराक्रम होता, त्याचप्रमाणें राज्यकारभारांतील कोणचेंही अंगावर घेतलेलें काम पार पाडावयाचें त्यांस अवसान होतें. त्यांनीं आपली कीर्ति दिगंतर करण्या करितां केवळ नुसत्याच लढाया मारून जय संपादला असें नाहीं. त्यांनीं लोकोपयोगी कामें केलीं व पुण्यांतील ओंकारेश्वराचें देऊळ त्यावेळची साक्ष देत उभें आहे. त्यांनीं नदीचे कांठावर आपला जयस्तंभ ह्मणून वरील देऊळ बांधण्यास सुरवात केली. अष्टपैलू देवालय बांधावें असा सर्वांचे मतें विचार ठरला व सर्वांस पसंत पडला. पुष्कळ कारागीर आणून कारखान्यास सुरवात केली. सर्व सामान तयार झालें. आपा वरती पैरवी ठेवूं लागले अंतर्भागीं पुष्कळ कमानी करून त्यावर घुमट ठेवीत चालले. एकंदर भव्य कमानी नऊ करून प्रत्येकीवर एकेक विशाळ घुमट तयार केलेला आंत जाण्यास दोन दरवाजे केले हें सर्व कर्तृत्व चितराव यांचें होय. हे एक ब्राह्मण कारागीर होऊन गेले. त्यांचे कसबाची

पराकाष्टा होती. देवालयाचे दोन्हीं बाजूंस दोन धर्मशाळा पांथस्थां करितां बांधिल्या. बाहेर एक चिमणबाग करून त्यांत नानाविश पुष्पवृक्ष लाविले. नदीचे पत्रापर्यंत घांट बांधिला. एकंदर खर्च एक लाखापेक्षां अधिक केला. या शिवाय देवालयास खर्चास नेमून दिलें.

पुण्यास असतांना देऊळ बांधून झाल्यावर आपांस स्वस्थ बसवेना. खरेंच आहे. जो शूर आहे त्यास लढायां वांचून एक दिवस जर सुना गेला तर त्यास तो फुकट गेलेला दिवस आपल्या आयुष्याचा व्यर्थ गेला असें वाटावयाचें, असा सृष्टिनियमच आहे. आणि आमचे आपा तर रणधुरंधर. मग आपांस कसें बरें स्वस्थ बसवेल? त्यांनीं कोंकणांत मोहीम करावयाची असा विचार केला. इकडे माळवा प्रांत काबीज करण्यांत वडील बंधू गुंतले आहेत असें पाहून आपणही कोंकण काबीज करावें असा विचार त्यांचे मनांत सहजच आला. त्यांनीं कोंकणचे सर्व परकीयांची चांगली रग जिरविण्याचा निश्चय केला. सर्व तयारी करून राजाज्ञेची वाट पहात होते. इतक्यांत राजाज्ञाही मिळाली. मग काय, "अधिकस्य अधिकंफलं." त्यांस पराकाष्टेचा आनंद झाला.

आपासाहेब जंगी लष्कर, तोफखाना, पायदळ, घोडे स्वार घेऊन निघाले ते तडक कोंकणांत गेले. मावळांतून फौजेसह जातांना आपला अंमल व आपला अधिकार बसवीत चालले. नंतर भिमाशंकर येथें दाखल झाले. तीर्थस्नानाचें मोठें पुण्य, ह्मणून स्नान करून शिवाचें दर्शन घेऊन पुढें चालले. व कोळवणाकडे मोर्चा फिरविला. सारें कोळवण काबीज केलें. नंतर वज्राबाईकडे वळून तेथील मुलुख घेतला. पुढें जाऊन माहुली किल्यास वेढा दिला. किल्ला हस्तगत होईना. आंतील लोक लढाई करण्याचें सोडीनात. आपांनीं किल्यास वेढा देऊन आंतील अन्नपाणी बंद केलें. तेव्हां किल्लेदार जरा हटला. आपांनीं आपली पराकाष्टा करून किल्ला हस्तगत करून वर चढून आपलें भगवें निशाण उभें केलें. किल्याखालील सर्व मुलुख काबीज केला. सर केलेल्या मुलुखावर आपले ठाणेदार व मामलेदार नेमिले. नंतर तेथून तळ हालवून कल्याणास आले. कल्याण भिवडी वगैरे मुलुख आपलासा करून सर्वभर पेशवे सरकारचा अंमल सुरू केला. अशी स्वारी मोहीम करून साताऱ्यास आली. राजकर्णीं सर्व हकिकत घातली. राजाची मर्जी खुष झाली. पुढें राजाज्ञा घेऊन आपा पुण्यास आले. बाजीराव साहेबांची भेट झाली. सर्व मजकुर निवेदन केला व पुण्यासच कांहीं दिवस मुकाम केला.

आपा कोंकणांतून स्वारी करून आले खरे परंतु सर्व कोंकणांत अंमल सुरू झाला नव्हता ह्मणून किंवा त्यांचा प्रताप सूर्य उगवून सर्व जगास दिसला नव्हता ह्मणून त्यांचे मनांत पुन्हां मोहीम करावी असें वाटलें. व त्याप्रमाणें त्यांनीं सर्व तयारी केली. मोहीम करण्याविषयीं बाजिरावांचाही रुकार मिळाला. नंतर जय्यत फौज, शिबंदी, तोफखाना वगैरे सर्व सामुग्री घेऊन मोठ्या कडेकोट बंदोबस्तानें निघाले. मनांत श्रीवर्धनचा सर्व मुलुख खालसा करावयाचा. ह्मणून तळें घोंसाळें, करनाळा, रेवदंडा, साष्टी वगैरे मुलुख झपाट्यानें सर करून तेथें आपला अम्मल सुरू करून मामलेदार नेमीत चालले. आपांनीं तिकडून वसईस जाण्याचा विचार केला व ते तिकडेच निघाले.

वसईस निघाले त्यावेळेस बरोबर सरंजाम कट्टा व शूर अनुभवीक सरदार, ह्मणजे शिंदे, होळकर, घोरपडे, बाजी भिवराव पोंवार, तुकोजीराव पोवार इत्यादी. असे सरदार आपांबरोबर असल्यावर मग त्यांस आणखीं काय पाहिजे. वसईकडे जातानांच बाजीरावांचे भाचे व्यंकटराव घोरपडे यांस गोंव्यास लष्करासहीत पाठविलें. शिंद्यांस डहाणू, केळवें तारापूर इकडे पाठविलें. घोरपड्यांनीं मोठा पराक्रम केला; व पोर्टुगीज लोकांस जेरीस आणिलें. तारापुराजवळ

शिद्यांनीं अतुल प्रताप करून तिकडील सर्व किल्ले हस्तगत केले. असे सैन्याचे बरेच भाग करून जिकडे तिकडे धामधुम उडविली. सर्वांस शरण येण्यास भाग पाडिलें. व आपण स्वतः सैन्याचा मोठा भाग घेऊन वसई किल्ला घेण्याचे उद्देशानें निघाले. तों सर्व सरदारही येऊन पोंचले.

वसईचा किल्ला सर्व कोंकणांत फार मजबूत व बळकट असून समुद्रांत. आणि फिरंग्यांचे हातांत सर्व सत्ता. तो त्यांचे ताब्यांत राहिला तर बरें नव्हे असें आपांस वाटलें. ठिकाण बळकट पडल्यामुळें आपल्या पाठीमागें फिरंगी आपणांस जुमानणार नाहींत, असें मनांत आणून पुढें काय करावें याबद्दल सर्व सरदारांचा सल्ला घेतला. विचाराअंतीं किल्ल्यास वेढा द्यावा असें ठरलें. त्याप्रमाणें आपांनी आपले सर्व फौजेचा किल्ल्याभोंवतीं गराडा घातला. शंकराजी नारायण यांस जमिनीचे वेढ्याची व्यवस्था सांगून पाण्याकडून मानाजी आंग्रे यांजकडून वेढा देवविला. याप्रमाणें किल्याभोंवतीं मराठ्यांचें कडें पडलें. आंत माशी फिरकूं देऊं नये असा वेढ्याचा बंदोबस्त व कोट. लवकरच आंतील लोक मऱ्यास आले, किल्लेदार फिरंगी यानें तहाचें बोलणें लाविलें. परंतु तो तह वसईसारखें मजबूत ठिकाण, शत्रू हातीं ठेवावयाचें नाहीं असें समजून

आपा कबूल करीनात. फिरंग्यांचा तोफखाना मोठा व सरंजामी होता. व त्या तोफखान्याचा मार चुकवावा म्हणून आपांनीं मोर्चामागें मोर्चे बांधविले. तीन महिने आपांनीं किल्ला घेण्याविषयीं भगीरथ प्रयत्न केले; परंतु ते आंतील लोकांचे एक जुटीनें, सहनशीलतेनें व तोफखान्यानें व्यर्थ गेले. तीन महिने किल्लेदारानें आपांस दाद दिली नाहीं. व किल्ला तो सोडीना. आपांनीं वारंवार एकदम हल्ला करून पहावा, आंत जाण्यास शिड्या लावून चढण्याचा प्रयत्न करावा, परंतु दाद लागेना. आपांचे चेहेऱ्यावर निराशा आपलें प्रीय वसतीस्थान बनवूं लागली. शिपाई फार जखमी होऊं लागले. किल्ला हस्तगत होईना. केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. फिरंगी लोक किल्ला सोडीनात. आपांचा तो तर घ्यावयाचा पूर्ण निश्चय व दृढतर प्रतिज्ञा. आपांनीं आपले सर्व सरदार जमा केले व पुढें काय करावें असें त्यांस विचारिलें. व आपा म्हणाले, "किल्ला तर हस्तगत होत नाहीं व आमचा, अशा अपजयानें तोंड काळें करून मागें फिरावयाचें नाहीं, हा निश्चय तर आतां मला तोफेचे तोंडीं बांधून माझें शीर तरी किल्ल्याचे तटाचे आंत पाडा म्हणजे मी धन्य होईन." हें ऐकून सर्व सरदारांस ईर्षा उत्पन्न झाली व ते म्हणाले, "सरकार हें काय हें. अहो, आज इतके-

जण आपल्या जिवाचे सोबती असतां आपलें हे काय अभद्र भाषण ! ” असें ह्मणून सर्वांनीं एकदम हल्ला करावा, असें ठरविलें. सर्वजण परत गेले, व आपले लोकांची तयारी करून एकदम किल्ल्यावर हल्ला केला. परंतु फिरंग्यांचे तोफांचे भडिमारामुळें व किल्ल्याचे बळकटीमुळें मराठ्यांस मागें परतावें लागलें. सर्व सरदार मागें परतले व किल्ल्यांतील फितूर आणण्याचा विचार करूं लागले.

फितूर आणण्याची मसलत सर्वांस पसंत पडली. मसलतीनुरूप खंडोजी मानकर हे गुराखी झाले. त्यांनीं नित्य किल्ल्यांत जाऊन लोकांचीं गुरें राखून, संध्याकाळीं तीं जागच्याजागीं पोंचतीं करावीं, असा त्यांनीं क्रम सुरू ठेविला. दुसरे आंजुरकर जातीचे पांचकळशे सुतार होते, त्यांनीं नित्य किल्ल्यांत जाऊन किल्ल्यांतील लोकांचीं घरें बांधावीं व त्याचप्रमाणें तिसरे दुल्ला बाजी मोरे यांणीं आंत जाऊन बायकांस बांगड्या भराव्या असा क्रम सुरू केला. आंतील भेद त्यांनीं कोणत्या रीतीनें आणिला हें लिहूं गेलें तर एक निराळा ग्रंथच तयार होईल.

किल्ल्यावर हल्ला करण्यास योग्य जागा या तीन सरदारांकडून समजूं लागल्या. व नंतर आपांनीं मल्हारराव होळकर यांचे सूचनेवरून तटास खिंडार पाड-

ण्याकरितां एका जवळ एक असे पांच जंगी सुरुंग तयार केले. त्यांत दारूचे बुधले भरून त्यांपैकीं चारांस एकदम सरबत्ती दिली परंतु त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कारण, फिरंग्याना ती बातमी समजल्या कारणानें त्यांनीं त्याच बेतानें आंतून सुरुंग पाडिले. त्यामुळें आपांचा सर्व प्रयत्न अगदीं फुकट गेला. शेवटीं आपांनीं पांचव्या सुरुंगास बत्ती दिली, त्यानें एक भगदाड पडलें. परंतु मराठ्यांना, फिरंग्यांचे तोफांमुळें पुढें जाववेना. ते परतले. फिरंग्यांनीं खिंडार भरून काढिलें. नंतर आपांनीं आपल्या लष्करापासून तटापर्यंत सुरुंग खणून त्यांत दारूचे बुधले भरून त्यास बत्ती दिली. त्यानें मात्र बरेंच काम झालें. त्यानें अर्धा अधीक बुरूज एकदम कोसळला. परंतु तो पुन्हां जागचेजागेवर बसला. आणि फिरंग्यांनीं तो लागलाच नीट करून टाकिला. नंतर दुसरा सुरुंग पाडावयास आपांनीं सुरुवात केली. व तो सुरुंग उड-विणार इतक्यांत फिरंग्याच्या मुख्याची स्त्री कांहीं लोकांसह आपले जहाजांत बसून बाहेर पडली. तें जहाज आंग्रे यांचे आरमाराचे दृष्टीस पडलें. व त्यांचे लोकांनीं तें पाहिल्याबरोबर एकदांच आरोळी ठोकि-ली. आरमारावरचे लोकांनीं धांवून तें जहाज आपले हस्तगत करून घेतलें; आणि आंतील लोकांस कैद

करून पाहतात तों त्यांत एक रूपवती स्त्री आहे. स्त्रीचा छळ कधींही करावयाचा नाहीं असा मराठ्यांचा जरी निश्चय व आप्पांचा हुकूम होता, तरी फार दिवसांनीं किल्ला हस्तगत होणार ह्मणून अति आनंदाच्या व गर्वाच्या जोरावर त्यांनीं तिचा पुष्कळ छळ करून तीस आपांसमोर आणिलें. ती तरुण व अति देखणी, कोणीही तिजकडे पाहिलें तर कामज्वरानें पीडीत होऊन जावयाचाच, अशा प्रकारचें तिचें मनोहर रूप होतें. परंतु आपांचा मनोनिग्रह कट्टा असल्यामुळें त्यांनीं तिला धरून आणिल्याबद्दल आपल्या लोकांची निर्भत्सना केली व कित्येकांस आपले लष्करांतून हांकून लाविलें. व त्या स्त्रीची मोठ्या उदार मनानें माफी मागून तीस साडी चोळी दाखल जहागीर देऊन मोठ्या इभ्रतीनें व मानानें आपले लोकांबरोबर तिची किल्ल्यांत रवानगी केली.

फिरंग्यानें आपले स्त्रीस मोठ्या इभ्रतीनें व मानमरातबनें, आणि तो मान देखील चिमाजी आपांसारख्या बलिष्ट मराठी शत्रूकडून, व ती त्यांच्या पूर्ण ताब्यांत आली असतांना, परत आलेली पाहून जो काय आनंद झाला असेल, त्याचें समर्थन करण्यास आमची लेखणी समर्थ नाहीं ह्मणून त्याची नुसती कल्पना तरी करण्याचें काम वाचकांवरच सोंपवितों. त्याचा हर्ष त्याचे

मनांतच नव्हे तर या सगळ्या अवाढव्य व अफाट आकाशभुवनांत मावेनासा झाला. वरील आपांच्या अमानुष कृत्यामुळें त्याचे मनांतील मराठ्यां विषयीं सर्व द्वेष वृद्धी नाहींशी झाल्याबरोबर प्रीतीनें आंत प्रवेश करून तेथें आपलें चिरायु रहतें वर केलें; व आपल्या त्या घरांत मोठ्या उल्हासानें व आनंदानें रमूं लागली. व तिनें त्या त्याच्या अंतःकरण रूपी किल्ल्यावर पूज्य बुद्धीचें निशाण फडकावलें. त्यामुळें फिरंग्या सारखे हिंदु द्वेष्ट्यानें मराठे शाईतील अती पूज्य आपांचे गूण अत्यानंदानें गावे व त्याचे वंशनांनींही अद्याप गात असावें यांत नवल तें काय? इतक्यांत त्याचे स्त्रीनें त्यास सांगितलें कीं, "मराठ्यांशीं लढून काय उपयोग! त्यांची फौज जोरावर व त्यांचे सेनापती पुण्यवान प्राणी. त्यांचे कबज्यांत मी अगदीं पूर्णपणें सांपडलें असता त्यांनी मजकडे नुसत्या वांकड्या दृष्टीनें देखील पाहिलें नाहीं. व माझा अपमान बिलकूल न करितां उलटें मला मोठ्या मानानें साडीचोळी दाखल जहागीर देऊन परत लावून आपलेकडे पाठविलें. अशा दैवशाली पुरुषापाशीं आपण लढूं नये हें फार उत्तम. त्यांचे पुढें आपला टिकाव बिलकूल लागणार नाहीं. त्यांस ईश्वर खचित सहाय्य आहे. व मराठ्यांचे नायक केवळ ईश्वरी अंशच आहेत. व इतकेंही करून जर तुह्मीं लढलेत तर तुमची

घडगत नाहीं व त्यांत तुह्मांस अपजय खात्रीनें येणार."

इतका मजकूर आंत होत आहे, फिरंगी आ ां लढावें किंवा न लढावें याबद्दल विचार करीत आहे व त्याचे सर्व लोक आपले सेनापतीच्या स्त्रीची विलक्षण रीतीनें झालेली सुटका पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घालीत आहेत तोंच आपांनीं बाहेरून, तयार केलेल्या सुरुंगास बत्ती दिली. त्या बरोबर मराठे लोकांनीं "हर-हर महादेव" असा शब्द करून एकदम किल्ल्यावर चाल केली. आंतूनही तोफांचा भडीमार होऊं लागला. त्या वेळीं मराठ्यांचे बरकंदाज लोकांनीं फारच शौर्य दाखविलें. सर्वजण आपआपले शस्त्रांचा पराक्रम दाखविण्यांत गुंतले.

इकडे फिरंगी लोकांनींही मोठ्या जलदीनें चिखलाच्या पांट्या आणून पडलेल्या बुरजापाशीं रचल्या. त्यांचे तोफांचा जबर मारा सुरू झाला. एक जोराचा गोळा आमचे वीर सेनापतीचे पायांपाशीं धोंधों करीत येऊन फुटला. परंतु आपांचे थोर नशीबामुळें तो भावी अनर्थकारक प्रसंग टळला. मराठ्यांनीं आपलें लढण्याचें सर्व कौशल्य दाखवून आपली शिकस्त केली. फिरंग्यानेंही आपले माऱ्याची कमाल केली. तोफांच्या धुरामुळें कांहीं एक दिसेनासें झालें. मराठ्यांचा अंगाशीं लढण्याचा इलाज चालेना. फिरंग्यानें तोफांवर व कुलपी गोळ्यांवर आ-

पला जीव वांचविला. मराठे माघारे आले तरी वेढा कमी केला नाहीं. त्यांनीं किल्ल्यांत अन्नपाणी वगैरे जाऊं देण्याचें बंद केलें. मग काय दुष्काळांत तेरावा महिना. आधींच मराठ्यांचा बाहेरून जंगी मारा, व किल्ल्यांत खडखडीत उपास. आंत अन्न नाहीं पाणी नाहीं. असें पाहून फिरंग्यानें घाबरून तहाचें बोलणें लाविलें.

तहाचें बोलणें आपांचे कानांवर आलें. फिरंग्याचें बोलणें कबूल करावें किंवा न करावें याबद्दल सर्व सरदारांचें मत घेऊन विचार केल्यावर असें ठरविलें कीं, जर फिरंगी लोकांनीं आठ दिवसांत किल्ला रिकामा करून स्वाधीन करून दिला तर तह करावा. याप्रमाणें ठरतांच आपांनीं त्यास आंत निरोप पाठविला कीं, "आठ दिवसांत तुह्मीं आपलीं मुलें माणसें बाहेर काढून किल्ला रिकामा करून द्याल तर बरी गोष्ट आहे. नाहीं तर पुढची तयारी आहेच." फिरंग्यानें तें बोलणें कबूल केलें. परंतु त्यांत त्यानें पेशव्यांकडून असें वचन घेतलें कीं, "आमचे पदरीं कारकून आहेत त्यांचा आमचे प्रमाणें संभाळ करावा व आमचे जातीचे लोकांस वेठ सांगू नये." आपांनीं ती गोष्ट कबूल केली. व त्यांनीं प्रत्येक कारकुनास दरसाल १५ मण भात व ३६ रुपये देण्याचें ठरविलें. फिरंग्यानें आठ दिवसांत आपली

चीजवस्त काढून किल्ला आमचे सदाविजयी मराठ्यांचे स्वाधीन केला; व तेव्हांपासून मराठ्यांचे अमलाचें व कीर्तीचें निशाण किल्ल्यावर फडकूं लागलें. तद्दाप्रमाणें किल्ल्याखालील नऊ लाखांचे मुलखावर आपांनीं आपला अंमल सुरू केला. ह्या प्रमाणें अत्यंत दुष्प्राप्य किल्ला आपांस मिळाला.

जो खराशूर लढवय्या, खरा देशाचा अभिमानी व खऱ्या कळवळ्याचा असतो तो लढाई नंतर आपल्या घायाळ पडलेल्या लोकांची काळजी घेतोच. त्याचें मन आपले लाखों स्वदेश बंधूंचीं प्रेतें पाहून विरघळून जातेंच. त्या प्रमाणेंच आमचे सेना नायकाची व त्याचे जेष्ट बंधू बाजीराव साहेब यांची स्थिती होती. आपा आपले तळावर आपले मित्रांची व देशहितकर्त्यांची अवस्था पहाण्यास बाहेर पडले. जे घायाळ होते त्यांना अन्न पाणी मलमपट्टी वगैरे देण्याची आपानीं स्वतः काळजी घेतली व सर्वांचा उत्तम प्रकारें बंदोबस्त ठेविला. लढाईंत ज्यांनीं शौर्याची फार कमाल केली त्यांपैकीं कोणास पालखी, कोणास चालपरवेशी व कोणास गांवही इनाम दिले. कित्येकांस नानपरवेशी लाविली. शंकराजी नारायण फडके त्रिनीवाले यांस वसईचा सुभा सांगितला. या प्रचंड मोहिमेंत फिरंग्याकडील व मराठ्यांकडील बरीच माणसें मेलीं

त्याच सुमारास आपांचें लष्कर इकडे अशा व्यवस्थेंत गुंतलें असतां आपांचे वडील बंधू बाजीराव नाहिरशहावर स्वारी करण्याकरितां निघून गेले. त्यांनीं आपांसही आपले कुमेकेस येण्याविषयीं पत्र पाठविलें. पत्र दर्शनींच आपांनीं शिंदेहोळकरांची तिकडे रवानगी केली व त्यांजबरोबर एक पत्र दिलें. त्या पत्रांत आपांनीं आपला वसईचे मोहिमेचा पराक्रम स्वहस्तें मोठ्या रसाळ वाणीनें बाजीरावसाहेबांस कळविला आहे. तें पत्र येथें देणार होतों परंतु तें बाजीरावसाहेबांचे चरित्रांत छापिलें असल्याकारणानें येथें दिलें नाहीं. तरी तें प्रत्येकानें वाचावें अशी सर्वांस आह्मीं सूचना करतों.

त्या पत्रावरून व वरील हकीकतीवरून आमचे चरित्र नायकाचा पराक्रम कसा होता हें वाचकांस सांगावयास नकोच. या त्यांचे पराक्रमावरून प्रत्येक मनुष्यानें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं ॥ निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ॥ व मनुष्यानें कसाही प्रयत्न करून तो जरी फुकट गेला तरी आपांप्रमाणें पुन्हां एकदां यत्न करून पहावा. आपांचा पराक्रम, त्यांचा मनोनिग्रह, त्यांचें शौर्य व त्यांचे औदार्यादि अमोलिक गुण अवर्णनीय आहेत व ह्मणूनच त्यांस मोहरा हें सन्मान्यपद शोभून जातें.

असो, शिंदे होळकरांनीं तें पत्र बाजिरावांस दिलें. त्यांना आपांचा पराक्रम, त्यांचा आज्ञाधारकपणा व त्यांची वडीलांस मान देण्याची रीत हीं पाहून फारच समाधान वाटलें. आपांच्या अलौकिक गुणानां पाहून सारें जग त्यांचें अभिनंदन करी; मग बाजीराव साहेब करितील हें वेगळें सांगावयास नको. बाजिरावांचा साह्य कर्ता, त्यांचें प्रीतीपात्र, त्यांचें केवळ साक्षात दुसरें अंतःकरण अशा आपांचें तें पत्र पाहून बाजि॰ रावांनीं तें प्रेमाश्रुनें भिजिवलें. आनंदानें आपले धाकटे बंधू चिमाजी असें वाटून त्या पत्रास कडकडून आलिंगन दिलें. जर त्याक्षणीं प्रत्यक्ष आपा असते तर त्यांनीं त्यांचें एकाद्या मातिप्रमाणें निंबलोण केलें असतें. सत्य गोष्ट आहे कीं, असा पराक्रमी आज्ञाधारक आणि नितीवंत मनुष्य असला तर त्याजवरून कोणीही सूज्ञ गृहस्थ आपला जीव ओंवाळून टाकील. मग निंबलोण तें काय? व त्याप्रमाणें बाजिरावानें त्यांचे हातचें पत्र पाहून केलें.

असो, आमचे चरित्र नायकाचा पराक्रम इतकाच किंवा त्यानें वर निर्दिष्ठ केलेल्या इतक्याच स्वाऱ्या केल्या असें नाहीं. तर त्यानें विश्रांती ह्मणून कधीं घेतलीच नाहीं. हिंदु धर्माला, हिंदु राज्याला व हिंदु ज्ञातीला त्रास देणाऱ्या परकीय शत्रूंना हैराण करण्यांत,

त्यांस पादाक्रांत करण्यांत व त्यांस आपल्या टोप्या काढून दांतीं तृण धरून शरण आणण्यांत त्यानें आपला बहुतेक काळ घालविला. त्यानें पुष्कळ वेळां आपले भावास ह्मणजे बाजीरावास शत्रूंचा पराभव करण्यांत मदत केलेली आहे. त्यानें कैकवेळां आपला पराक्रम, माळव्यांत, गुजराथेंत, कर्नाटकांत व कोकणांत गाज-विला आहे. त्यानें सर्व हिंदुस्थानभर आपली तर-वार गाजवून आपली कीर्ती यावत्चंद्र दिवा करों करून टेविली. त्यानें कितीएक वेळां नासीरजंगास, निजामउलमुलुखास, मोगलांस, आंग्र्यास, शिद्दीस फिरंग्यास व इंग्रज लोकांसही आपलें युद्धकौशल्य दाखवून थक्क करून ठेविलें. आपाचा दरारा जिकडे तो जाई तिकडे असे. त्याचे भावाप्रमाणेंच त्यास सर्व मराठेशाईचे शत्रू भिऊन थरथर कांपत. अशा आमच्या या अद्भुत योध्यानें केवळ भात व ताक खाऊ ब्राह्मणाचे पोटीं येऊन नुसता ताक भात खाऊन नुसत्या भाताचें व पाण्यासारख्या ताकाचें अवर्णनीय तेज सर्व देशांतील सर्व जातींचे लोकांस दाखविलें. व विशेषतः ॥ पयात् दश गुणं मासं ॥ असें ह्मण-णाऱ्यास खालीं पहावयास लाविलें. ब्राह्मण ह्मणजे केवळ खरडेघांशा असा सर्वांचा बहुत दिवसांचा भ्रम उडवून टाकिला. आमच्या आपानें व बाजीरावानें

शिवाजी महाराजांनीं स्थापिलेल्या गादीचा खरा मान राखून व त्यांचेंच गोब्राह्मणाचे पालनाचें व्रत कडक रीतीनें पाळून आपली व मराठेशाईची कीर्ती अजरामर करून ठेविली आणि ती देखील स्वतःचे तरवारीचे जोरावर. बाजी शाहुमहाराजांचा उजवा हात व आपा बाजिरावाचा उजवा हात. दोघांचा पराक्रम अतुल्य आणि दोघांनीं, मागें ब्राह्मण सरदार होते, आणि ते देखील फालतु नव्हेत, तर सिंहाप्रमाणें बलवान व तरवारीचे धारेप्रमाणें तेजरूप जवान मर्द होते, व त्यांनीं आपल्या समशेरी गाजवून सर्वांस पाजी करून सोडून आपल्या गाजीपणाचें वर्णन करण्यास आह्मांसारख्यांस उत्कृष्ट संधी दिली ह्मणून त्यांचा आह्मां महाराष्ट्रीयांस अभिमान कां नसावा ? असलाच पाहिजे.

आपा केवळ योद्धाच होता व त्याला नुसत्या लढायाच मारतां येत होत्या असें नाहीं; व युक्ती प्रयुक्तीनें आपल्या शत्रूंचा पराभव करावा इतकीच त्याचे अंगांत कर्तबगारी होती असेंही नाहीं. तर ज्याप्रमाणें तो लढाईंत सूर्याप्रमाणें चमके त्याचप्रमाणें राज्यकारभारांतही चमकत असे. बाजीरावास राज्यप्रकरणीं सर्व मदत आपानेंच केलेली आहे. ज्याप्रमाणें तो शूर, धाडसी योद्धा होता त्याचप्रमाणें तो कल्पिक

फर्डा मुत्सद्दीही होता. राज्यकारभार स्वतः एकट्याच्या शिरावर घेऊन तो करीत असे. पुणें शहरचे रचनेचें सर्व काम त्याचेच हातून झालेलें होतें असें ह्मणतात. तो मुत्सद्दी या नात्यानें व तो आमच्या हिंदु पक्षाचा वाली या निकट संबंधानें आह्मीं त्याची प्रशंसा करावी तितकी थोडीच. गोष्ट खरी आहे कीं, शिरावर राज्याचा भार असला ह्मणजे कोणीही मनुष्य आपल्या कल्पना जागृत ठेवितो व त्याचे कल्पक मेंदू पासून कांहींतरी निष्पन्न होतें. त्याचप्रमाणें स्वराज्य असलें ह्मणजे लढाईचा आवेश सर्वांचे अंगांत येतोच. तथापी आपलें राज्य नाहीं ह्मणून आह्मांस शक्ती नाहीं किंवा आपण बलहीन झालों आहों असें नाहीं. तर आपल्या बलहीनतेस आपलें राज्यकार्यधुरंधर सरकारच एक कारण आहे. तें जर न्यायानें, निःपक्षपातानें व दिलेल्या वचनाप्रमाणेंचालेल तर आह्मीं आहों त्यापेक्षां शतपट सर्व गुणांनीं युक्त होऊत आनंदी होऊं. ते इंग्रज लोक आपण सर्व मुलें एका बापाचीं, एका ईश्वराचीं असें ह्मणतात, निदान आठवड्यांतून एकदां तरी ऐकतात असें असतांही त्यांचा येशु-ख्रिस्त आह्मां हिंदु प्रजेचे कळवळ्याबद्दल आपले शिष्यांवर कमलीही सुप्रेरणा करीत नाहीं हें एक आश्चर्य नाहीं काय ? इंग्रज लोकांनीं आमचें हित, अनहीत, न्याय,

अन्याय, पाहून राज्य केलें तर त्यांचे राज्यास अधिक अधीक बळकटी येऊन त्यांचें राज्य चिरस्थायी होईल अशी आमची पूर्ण खात्री आहे. असो. त्यावेळेस आपांचे सर्व अलौकिक व अमोलिक गुण केवळ स्वराज्य होतें ह्मणून चमकत होते असें नाहीं तर ॥ गुणः पूजा स्थानं गुणिषु ॥ या न्यायानेंच ते सर्व हिंदुस्थानभर चमकत होते. त्यांचा पराक्रम, त्यांचें शौर्य, त्यांचा मनोनिग्रह, त्यांची शांतता इत्यादि त्यांचे इतर गुणांची तोड दुसरे ठिकाणीं क्कचितूच सांपडेल.

असो, आमचा योद्धा कोंकणांत आपले बाहुबला पुढें सर्वांस नाकें घांसण्यास भाग पाडीत होता. व तिकडची मोहीम आटोपल्यावर वडील बंधूचे आज्ञेप्रमाणें नादीरशहावर स्वारी करण्यास निघाला. शिंदे, होळकर पूर्वींच गेले होते. आपा निघाला तोंच तिकडे नादीरशहा दिल्लीहूनच आपल्या देशास परत गेला. त्यावेळेस बाजीरावास आपला हात दाखविण्याची आलेली हुरुरी एकाएकीं नाहींशी झाली. यामुळें जसा एखादा खवळलेला केसरी हत्तीवर तर नाहीं पण कोणातरी लहान सहान श्वापदावर उडी टाकावयास पाहतो, त्याचप्रमाणें बाजिरावानें, निजाम सरकाराकडे कांहीं खंडणीचा ऐवज बाकी येणें होता तो तगाद्यानें देखील येत नाहीं असें पाहून त्यानें आपला मोर्चा

हैदराबादेकडे वळविला. बाजिरावापाशीं सामना करण्याकरितां निजामानें आपले नासीरजंग नांवाचे पुत्रास पाठविलें. त्यांच्या कांहीं झटापटी झाल्या परंतु त्यांत कांहीं विशेष झालें नाहीं. एका प्रसंगीं बाजिरावानें नासीरजंगाचे फौजेस वेढा दिला. व आंतील लोकांवर तोफांचा व बंदुकींचा भडीमार सुरू केला. इतक्यांत नासीरजंगाचे कुमेकेस दुसरें एक मोठें लष्कर आलें. त्यामुळें त्यास हुरूप येऊन तो मराठ्यांचे सैन्यास तोंड देऊन उभा राहिला. त्या प्रसंगीं नासीरजंगानें मोठे निकराची लढाई करून मराठ्यांची बरीच दाणादाण केली. वेढा उठला. खानास आपल्यास जय खचीतच प्राप्त झाला, असें वाटून तो आपले राजधानीकडे मुलुख जाळीत व लुटीत चालला. अशा ऐन समयीं आपा आपले लष्करासह वडील बंधुचे मदतीस येऊन पोंहोंचला. बाजीरावास अत्यानंद झाला व त्यास नवा दमही आला. त्यानें नासीरजंगास हलके हलके आपल्या अंगावर घेऊन योग्यवेळीं हातघाईस येऊन त्यास पिटून लाविलें. अशी जेव्हां कित्येक वेळां त्याचीं हाडें खिळीं झालीं त्यावेळेस निजामानें पेशव्यांपाशीं तह करून त्यास हिंदीआ आणि किरकोण हे प्रांत जहागीरी दाखल दिले. इतक्यांत बाजिरावाचे ज्येष्ठ पुत्र नानासाहेब, लढत असतां कुमकेविषयीं पत्र आलें. पत्र

देखतांच बाजिराव व आपा नानाचा पराक्रम पाहून पोट भरून हंसले. व बाजिरावानें आपास तावडतोब कोंकणांत जावयास सांगितलें.

झालें, हीच त्या दोघां भावांची शेवटची भेट. आपा कोंकणांत वळल्यावर बाजिराव मुसलमानांचें पुरें पारिपत्य करण्याकरितां उत्तरेकडे चालले. परंतु त्यांचे पुढें महाराष्ट्रीयजनांचें दैव आडवें आलें. त्यांचा नर्मदातीरीं मुक्काम असतां ज्वराची भावना झाली. अन्न तुटलें व हेंच दुखणें शेवटचें अशी त्यांची पूर्ण खात्री झाली. ह्मणून त्यांनीं शिंदेहोळकरांस जवळ बोलावून राज्यकारभाराविषयीं थोडा उपदेश केला. व मुसलमानांचीं पाळें मुळें खणून हिंदूपादशाही स्थापण्यास सांगितलें. राज्यकारभार प्रकरणीं आपांस जे काय निरोप सांगावयाचे ते सांगितले व हा मराठ्यांचे कीर्तीरूप पृथ्वी भोंवती सतत व अश्रांत फिरणारा तेजोमय भगवान मरिचमालिनी ता. २८ माहे एप्रील इ. स. १७४० इसवी रोजीं सकाळींच अस्ताचलास गेला.

पुढें मराठ्यांचा प्रतापसूर्य मावळला: सर्व महाराष्ट्ररूपी समुद्रावर दुःखरूपी भयंकर तुफान झालें. सैन्यांतील सर्व सरदारांनीं व शिपायांनीं त्यांचें प्रेत पाहून ढळढळ अश्रू गाळले. ज्याचे अंगांत आदले दिवशीं प्रत्यक्ष काळदेखील भीऊन जाईल असा दरारा होता

त्यासच यमानें आपले बरोबर ओढून नेलें. हें दुःखकारक वर्तमान शाहूमहाराजांस कळलें तेव्हां आपला उजवा हातच गळला असें वाटून ते दोन घटका मुर्छित झाले. ही बातमी चुलते व पुतणे रेवदंडा घेण्याचे मसलतींत होते त्यांस जाऊन पोंचली. आपा धाडकर जमिनीवर पडला. त्याचें सर्व अंग घामानें चिंब झालें. तो फार मोठ्यानें आक्रोश करूं लागला. त्याचे शोकाचें व पुण्यास वाड्यांत बातमी समजल्यावर श्री. काशिबाईचे शोकाचें वर्णन करण्यास आमची एकमती लेखणी असमर्थ आहे. आपणच आतां वडील असें मानून मोठ्या सूज्ञपणानें व ॥ आलीया भोगासी असावें सादर ॥ या साधु वाक्यावर विश्वास ठेवून आपांनीं सर्व विधी आटोपून व खंडोजी मानकर यास कोंकणांत लष्करासह ठेविलें; व आपण पुतण्यास घेऊन पुण्यास आले. तेथून नानास साताऱ्यास नेऊन सर्व हकीकत महाराजांस कळवून नानाचे नांवाचे शिके मोर्तब करून त्यांस पेशवाईचीं वस्त्रें देवविलीं; परंतु त्यांस बंधू वियोग दुःसह होऊन राहिला होता. पेशव्यांचें पद नानास दिल्यावर आपलें येथील काम आटोपलें असें समजूनच कीं काय? हा आमचा मोहरा, आमचा वाली, आमचा योद्धा, आमचा मुत्सद्दी, उदार व सुशील महात्मा बाजीरावाचा खरा पाठिंबा व उजवा

हात, ज्यानें आपल्या तरवारीचे जोरावर सर्व महाराष्ट्र गाजवून व आपलें शौर्य या भरत भूमीवर अजरामर करून आपले विमल कीर्तीचा दिव्य झेंडा हिंदुस्थानांत खोंचून, आपले बद्दली एक पुत्ररत्न ठेवून, आपले वडील बंधूस स्वर्गांत सहाय करण्यास, कीं काय आह्मां सर्वांस शोकसागरांत बुडवून इ० स० १७४१ त निजधामास गेला. त्याचे पाठीमागें त्याचे कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाचे पर्वताचें वर्णन करितांना आमचे लेखणीची, ॥ नलगे सांगावा चंदनाचा परिमळ ॥ इतकेंच सांगून गती खुंटली त्यास उपाय नाहीं.

---

समाप्त.

लौकरच तयार होणार.

# गड आला पण सिंह गेला.

ही लहानशी ऐतिहासिक गोष्ट जोरदार भाषेनें याच चरित्र लेखकानें लिहीली असून ती छापूं घातली आहे. लौकरच तयार होईल. घेऊं इच्छिणारांनी खालील पत्त्यावर तूर्त सह्या पाठवाव्या. किंमत २ आणे. ट. हां. ०॥ आणा.

पत्ता—गोपाळ गोविंद खरे,

आंग्रच्याची वाडी गिरगांव मुंबई.

# शुद्धिपत्रक.

| पृ. | पं. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १६ | त्रोकट. | त्रोटक. |
| २ | १४ | प्रामाणीक. | प्रामाणिक. |
| ४ | १८ | यांचें. | याचें. |
| ५ | १२ | त्याची. | याची. |
| ६ | १४ | नाहींसे. | नाहींसें. |
| ६ | १४ | झाले. | झालें. |
| ६ | २१ | पूर्व जन्म | पूर्व जन्म. |
| १० | ११ | गट. | गट्ट. |
| १० | १२ | ह्मणून. | ह्मणून, |
| १३ | २ | गूण. | गुण. |
| १५ | १७ | की. | कीं, |
| १८ | १ | येउन. | येऊन. |
| १८ | १५ | घेउन | घेऊन. |
| १९ | ६ | नितीमान. | नीतिमान्. |
| १९ | १५ | ऐसे. | असे. |
| १९ | १८ | खुडणीचा. | खंडणीचा. |
| २० | १७ | अज्ञेवरून. | आज्ञेवरून. |
| २१ | ६ | लावीत. | लावित. |
| २१ | २० | गिरीधर. | गिरिधर. |
| २३ | ९ | नन्हते. | नव्हतें. |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | ४ | दुर्शशा. | दुर्दशा. |
| २४ | २१ | स्वाऱ्यावर. | स्वाऱ्यांवर. |
| २५ | ९ | कीर्ती. | कीर्ति. |
| २५ | २० | केलेला. | केला |
| २६ | ४ | पत्रापर्यंत. | पात्रापर्यंत. |
| २७ | २१ | मजकुर. | मजकूर. |
| २९ | २० | आले, | आले. |
| ३१ | १ | है. | हें. |
| ३२ | ३ | दिली | दिली. |
| ३२ | १२ | वरेंच. | बरेंच |
| ३२ | १३ | अधीक. | अधिक. |
| ३४ | ५ | रहत. | राहत. |
| ३४ | १० | वंशनांनाही | वंशजांनीही. |
| ३४ | १४ | असता. | असतां. |
| ३४ | १६ | बिलकूल. | बिलकुल. |
| ३४ | २१ | सहाह्य. | सहाय्य. |
| ३८ | ३ | नाहीरशहाकर. | नादीरशहावर |
| ४२ | १४ | आहे | आहे. |
| ४३ | ६ | गुण: | गुणा: |
| ४५ | २२ | भीउन | भिऊन |
| ४६ | १७ | पेरावाईची | पेशवाईचीं. |
| ४६ | ४४ | मुर्छित. | मूर्छित. |
| ४६ | १३ | व | ० |
| ४७ | ७ | ० | तो. |

# खालील पत्त्यावर विकत मिळतील.

| | | रु० आ० |
|---|---|---|
| साळूबाई कृत चंद्रप्रभाविरह वर्णन | ( मनोरंजक सुरस कादंबरी ) | २—० |
| श्री वेदांतसूर्य... | ... ... ... ... ... | ३—८ |
| भक्तिसुधा | ... ... ... ... ... ... | ०—१२ |
| उपयुक्त धर्मशास्त्र संग्रह... | ... ... ... ... | २—० |
| शारंगधर वैद्यक ग्रंथ ( मराठींत ) | ... ... ... | ३—० |
| कठिण शास्त्रांतल्या सोप्या गोष्टी अथवा शास्त्रीय विषयांचें सुलभ विवेचन | ... ... ... | ०—६ |
| उपयुक्त नित्यपाठसंग्रह ... | ... ... ... ... | ०—४ |
| संगीत श्रीकृष्णलीलामृत अथवा गवळण काला | ... ... ... ... | ०—१० |
| प्राकृत पंचरत्नी गीता... | ... ... ... ... | ०—८ |
| सप्तशती... | ... ... ... ... ... ... | ०—१२ |
| पंचीकरण... | ... ... ... ... ... ... | ०—३ |
| पांडव स्वर्गारोहण पर्व... | ... ... ... ... | ०—३ |
| हरिश्चंद्र आख्यान | ... ... ... ... ... | ०—४ |
| पांडुरंग महात्म... | ... ... ... ... ... | ०—८ |
| यंत्रकला प्रकाश... | ... ... ... ... ... | ०—१२ |
| शैव चरित्र कथा | ... ... ... ... ... | ०—४ |
| संशयी स्त्री ... | ... ...... ...... ... | ,, ६ |
| निळ्या दाढीचा मनुष्य.. | ... ... ... ...... | ,, १ |
| चमत्कारिक पैंजण... | ...... ......... ... | ,, १ |
| टार्केशटेल्स...... | ... ...... ...... ...... | १ ,, |
| यंत्रकला ...... | ...... ...... ......... | ,, १२ |
| वसंतविलास | ... .... ...... ...... ... | ,, ६ |

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| चंदन मलयागिरी.............................. | ,, | ८ | ,, |
| भीष्मनीति..................................... | ,, | ६ | ,, |
| गोपाळकाला...... :.......................... | ,, | २ | ,, |
| बहुरुपी सोंगें ................................ | ,, | ६ | ,, |
| पुराणयुक्त रत्नमाला ........................ | ,, | ६ | ,, |
| सोन्याची लंका ............................... | ,, | १ | ,, |
| दामाजीपंताचा फार्स ......................... | ,, | ४ | ,, |
| विनोदरत्न भांडार.............................. | ,, | १ | ६ |
| दारूकाम ........................................ | ,, | २ | ,, |
| प्रमिला स्वयंवर ................................ | ,, | ८ | ,, |
| डोहाळे जेवण ................................. | ,, | ४ | ,, |
| कनकमंजरी .................................... | ,, | ८ | ,, |
| पुणेरीमैना ...................................... | ,, | १० | , |
| पांडव चाळीशी................................. | ,, | १२ | ,, |
| शुक छत्तीशी .................................. | ,, | ६ | ,, |
| नानाची स्थिती................................. | ,, | ६ | ,, |
| सं. गोपीचंद ................................... | ,, | ६ | ,, |
| ,, हरिश्चंद्र....................................... | ,, | ६ | ,, |
| ,, श्रियाळ ...................................... | ,, | ६ | ,, |
| ,, भद्रायु आणि कीर्तिमालिनी ,,.................. | ,, | ६ | ,, |

किमतीशिवाय ट. हां. निराळें पडेल. वरील पुस्तकांपैकीं दोन रुपये किमतीचीं अथवा त्याहून अधिक पुस्तकें घेणारास २५ टक्के कमिशन दिलें जाईल. पांच रुपयांचीं घेणारास खराप्रकार मासिक पुस्तकाचें समग्र एक वर्षाचें बांधलेलें पुस्तक बक्षीस देण्यांत येईल.

**पत्ता 'बॉम्बे न्यू प्रेस'**-कावसजी पटेल टांकरोड मुंबई

# 'बॉम्बे न्यू प्रेस' मध्यें विकत मिळतील.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| अरे, पण मीच गुलजार चंद्री .... | ०–८–० |
| प्रेम-परीक्षण नाटिका. ४ अंकी नाटक. | ०-१०-० |
| गोडंबीचा फार्स ( चलाखचंपा. ) .... | ०-४-० |
| उद्योग नशिबाचा कारागीर ........ | ०–४–० |
| मुंबईचा दंगा .... .... .... | ०–२–० |
| जयसिंगराव नाटक..... .... .... | ०-१२-० |
| बोधमाला–मणि ४ था. .... .... | ०–१–० |
| सं. श्री. थोरले माधवराव पेशवे नाटक | ०–४–० |
| किमया..... .... .... .... .... | ०–१–० |
| आगबोटींतील किंवा रेलवेंतील कर्मणूक नंबर १ला. .... | ०–२–० |
| सजीव यमपुरी किंवा ९२ दिवसांचा आमचा कारागृहवास. | ०-४-० |
| दादाभाई चरित्र. .... .... .... | ०–०–९ |
| श्री. शिवछत्रपति विजय नाटक .... | ०–९–० |
| संगीत सौभाग्यरमा अथवा वैधव्य दुःख विमोचन नाटक. | ०–७–० |
| संगीत सावित्री .... .... .... | ०–६–० |
| सद्गुणग्रंथी अथवा बाजीराव मस्तानीची पहिली भेट .... | ०–१–० |

टपाल हंशील निराळें पडेल.

पत्ता–'बॉम्बे न्यू प्रेस' कावसजी पटेल ट्यांकरोड मुंबई.

☞ पुस्तकें एकदम घेणारांस खरापमकार मासिक पुस्तकाचे १२ अंकांचें संबंध एक बांधलेलें पुस्तक बक्षीस दिलें जाईल.

ता. १ अक्टोबर १८९२ पासून सुरू झालेलें.

## सचित्र-विक्षिप्त.-वर्तमानपत्र.

दर शनिवारीं सकाळीं प्रसिद्ध होतें. अनेक सज्जनांस प्रिय झालें आहे. वर्षाची वर्गणी १॥ रु. ट. हां. ०१३ आ मुंबईतील वर्गणीदारांस ट हां. नाहीं.

चमत्कारिक नांव असल्यामुळें कित्येकांचे मनाचा कल कांहींसा विलक्षण प्रकारचा होईल, परंतु तो तो त्रुटीचा ठरेल यांत संशय नाहीं. या पत्रांतील लेख मार्मिक, पोक्त, मनोरंजक, करमणूक होण्याजोगे, योग्य वळण लागण्याजोगे असे असतात, एखादास तरवार [illegible] अंगास [illegible] मात्र हा 'विक्षिप्त' आपला पाय कधींही माघार घेत नाहीं [illegible] विशेष [illegible] या वर्तमानपत्राबद्दल माहिती समजली नाहीं, तरी पण ज्यांचे वाचण्यांत एकवार हें पत्र येतें, ते लागलेच याचे वर्गणीदार होत आहेत. करितां सर्वांनीं या नूतन देशसेवेस आपला हात भार लावावा अशी सप्रेम विनंती आहे. या पत्राचा सांचा केसरी पत्रा एवढा आहे

[illegible] मु. भाळे, म्यानेजर

पत्ता-विक्षिप्त ऑफिस;
कावसजी पटेल ट्यांकरोड मुंबई.